# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
कृषिनगर, अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

Phone No. : 0724-2258372
E-Mail –registrar@pdkv.ac.in


**महत्वाचे**

विद्यापीठांतर्गत कार्यरत असलेले सर्व कार्यालय/ विभाग तसेच महाविद्यालय/ कृषि तंत्र विद्यालय/ कृषि विज्ञान केंद्र यांचे कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या कार्यालयीन स्तरावर अंतर्गत तक्रार समितीचे गठन करण्याबाबत.....

वाचा : (१) शासन निर्णय क्रमांक : मकचौ-२०२५/प्र.क्र.२५/का-१५, दि. २२ ऑगस्ट, २०२५
(२) विद्यापीठ परिपत्रक क्र. बीएबी/म.त.नि.स./२०२२/७९, दि. १५ मार्च, २०२२

## परिपत्रक

क्र. बीएबी/अं.त.स./२०२६/१८५/76 दिनांक : ०८ एप्रिल, २०२६

कामाच्या ठिकाणी होणा-या लैंगिक सतावणुकीस प्रतिबंध करण्यासाठी १९९२ चा रिट विनंती अर्ज (सीआरएल) क्र. ६६६-७० मधील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयातील मार्गदर्शक तत्वे भारत सरकारकडून प्रसृत करण्यात आली आहेत. या मार्गदर्शक तत्वांची राज्य शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियमामध्ये सुधारणा केलेली आहे.

वाचा येथील शासन निर्णयानुसार कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासुन संरक्षण, प्रतिबंध, मनाई व निवारण अधिनियम २०१३ मधील कलम ४ (१) अंतर्गत कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी विद्यापीठांतर्गत सर्व कार्यालयांमध्ये ''अंतर्गत तक्रार समिती'' गठीत करणेबाबत सुचित करण्यात आलेले आहे. त्यानुसार वाचा येथील संदर्भिय क्र. १ नुसार आपले स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

विद्यापीठातील सर्व कार्यालय/ विभाग तसेच महाविद्यालय/ कृषि तंत्र विद्यालय/ कृषि विज्ञान केंद्र यांचे कार्यालय प्रमुखांनी त्यांचे कार्यालयीन स्तरावर **'अंतर्गत तक्रार समितीचे'** गठन करणेबाबत संदर्भिय क्र. २ नुसार सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने पुन:श्च सुचित करण्यात येते की, ज्या कार्यालय प्रमुखांनी आपल्या स्तरावर उपरोक्त समितीचे गठन केले नाही त्यांनी समितीचे गठनाबाबतची कार्यवाही त्वरित करावी आणि केलेल्या कार्यवाहीबाबत **१० दिवसांचे आत** या कार्यालयास अवगत करावे. सदर प्रकरणी भविष्यात काही समस्या उद्भवल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी कार्यालय प्रमुख यांची राहील.

सर्व कार्यालय प्रमुखांनी अंतर्गत तक्रार समितीची माहिती त्यांच्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावावी. तसेच सदर परिपत्रक कार्यालयात कार्यरत असलेल्या सर्व महिला अधिकारी व कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देण्यात यावे.

मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने.

(प्रिती वि. रोडगे)
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रति,
..................................
..................................
..................................

प्रतिलिपी : प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहितीकरीता. तसेच आपणास कळविण्यात येते की, सदर माहिती विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.